दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३७ वा शनिवार दि.०९ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# अमित देशमुख महाराष्ट्राचे उभरते नेतृत्व या नेतृत्वाला रोखण्यासाठी भाजपने आखलेले मत विभाजनाचे षडयंत्र उधळून लावा-नानाभाऊ पटोले

**महाविकास आघाडीला विजयी करण्याचे आवाहन, लातूरच्या प्रगतीसाठी महाविकास आघाडी कटिबद्ध असल्याची आमदार अमित देशमुख यांची ग्वाही**

लातूर / प्रतिनीधी :- लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार लातूरचे सुपुत्र माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे नेतृत्व करणार आहेत या नेतृत्वाला इथेच रोखण्यासाठी भाजपने आखलेलं मत विभाजनाचे षडयंत्र उधळून लावा, लाखोंच्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी आज लातूर येथील अण्णा भाऊ साठे चौकात आयोजित महाविकास आघाडीच्या विशाल जाहीर सभेत बोलताना केले. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारासाठी प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांची लातूर येथील अण्णा भाऊ साठे चौकात प्रचंड विशाल जाहीर सभा झाली. या सभेत उपस्थित नानाभाऊ पटोले व मान्यवरांचे लातूरकरांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी बोलतांना अमित विलासराव देशमुख यांनी येथील जनतेने आजवर दिलेल्या संधीबद्दल आभार व्यक्त करून, पुढील कार्यकाळासाठी आशीर्वाद मागितले. याप्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री तथा लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी खासदार सुधाकर शृंगारे, माजी आमदार वजाहत मिर्झा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजा मणियार, मोईज शेख, माजी महापौर विक्रम गोजमगुंडे, अॅड. किरण जाधव, सुनील बसपुरे, विक्रांत गोजमगुंडे, दिपक सूळ, वैजनाथ शिंदे, उदय गवारे, श्रीशैल उटगे, माजी आमदार रामहरी रुपनवर, अशोक गोविंदपूरकर, कैलास कांबळे, जगदीश बावणे, मविआचे सर्व नेते-पदाधिकारी उपस्थित होते. नाना पटोले पुढे म्हणाले की, अमित देशमुख यांनी विलासराव देशमुख साहेबांनी जोपसलेला शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा पुढे नेण्याचे काम केले आहे. विलासराव देशमुख यांनी सर्वधर्म समभाव हा विचार घेऊन राजकारण केले. मात्र भाजपकडून समभाव विचारांना संपवण्याचे काम केले जात आहे. अमित देशमुख यांना रोखण्यासाठी मतविभाजनाची खेळी भाजपा खेळत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक उमेदवार उभे केले आहेत. मात्र अमित देशमुख हे महाराष्ट्र राज्याचे होणारे नेतृत्व आहेत. त्या नेतृत्वाला संपवण्याचे काम भाजप करत आहे. त्यामुळे मत विभाजन होऊ देणार नाही, असे वचन देण्याचे आवाहन पटोले यांनी यावेळी केले. भाजपामुळे मागील साडेसात वर्षात लातूरसह महाराष्ट्र राज्याच्या विकासात खोडा घातला असल्याची टीकाही पटोले यांनी केली. मात्र पुढील काळात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येणार ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे. आमचे सरकार सत्तेत येताच आम्ही पंचसूत्री कार्यक्रम राबवून समाजातील सर्व घटकांना न्याय देणार असल्याचेही पटोले यावेळी म्हणाले. यावेळी बोलतांना अमित विलासराव देशमुख म्हणाले, लातूरमध्ये आजवर जो काही विकास झाला आहे तो फक्त काँग्रेस पक्षाने आणि या पक्षाच्या नेत्यांनी केला आहे, महायुतीच्या नेत्यांनी येथे येऊन आश्वासने दिली परंतु त्यापैकी एकाही आश्वासनाची कधीही पूर्तता झाली नाही असे सांगीतले महायुतीचे सरकार राज्यात आणि केंद्रात सत्तेत आल्यापासून लातूरचा विकास खुंटला आहे महायुतीचे सरकार राज्यात आणि केंद्रात सत्तेत आल्यापासून लातूरचा विकास खुंटला आहे, एवढेच नाही तर भ्रष्टाचार गुंडगिरी, अवैध धंदे वाढले आहेत, हे चित्र बदलण्यासाठी आपणाला महाराष्ट्रात परिवर्तन घडवायचे आहे, त्यासाठी मला आपले आशीर्वाद हवे आहेत. काँग्रेसच्या मान्यवर नेत्यांनी लातूरचे नेतृत्व केले असल्यामुळे, हे शहर दार नसलेले घर बनले आहे, येथील प्रत्येक नागरिक सुरक्षित आहे, माझ्या पूर्वीचे नेते आणि मी कायम पारदर्शक आणि भ्रष्टाचार मुक्त कारभार केला आहे असे सांगीतले.. सामाजिक सलोखा टिकून राहील यासाठी सातत्याने प्रयत्न केले पूढे बोलतांना ते म्हणाले, लातूरची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहील, येथील सामाजिक सलोखा टिकून राहील यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत, अलीकडच्या काळात मात्र समाजा समाजात भांडणे लागावीत, शांतता निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न झाले आहेत, ते प्रयत्न आपण हाणून पाडले आहेत, भविष्यात असे धाडस करू नये यासाठी आपण त्यांचा बंदोबस्त करावयाचा आहे, लातूरमध्ये आणि संपूर्ण महाराष्ट्रत महापुरुषांबद्दल अवमानकारक वक्तव्य करू नये यासाठी महाविकास आघाडीचे सरकार येताच कठोर शिक्षेची तरतूद असलेला कायदा करण्यात येईल अशी ग्वाही याप्रसंगी दिली, लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीत





एकजूट दाखवून पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विजयासाठी प्रयत्न करावेत महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही एकजूट दाखवून माझ्या विजयासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करून काँग्रेस आणि घटक पक्षातील सर्व पदाधिका कार्यकर्त्यांचा कायमपणाने सन्मान राखला जाईल अशी ग्वाही यावेळी दिली महिलांना मोफत प्रवास देणारी लातूर पहिली महापालिका राहुल गांधी यांनी आपल्या राज्याला पंचसूत्री कार्यक्रम दिला आहे. काँग्रेस गॅरंटी कार्ड, महिलांना महिन्याला ३ हजार रुपये देणार आहे. देशात महिलांना मोफत बस प्रवास देणारी लातूर ही पहिली महापालिका असल्याचे त्यांनी यावेळी अभिमानाने सांगितले. संपूर्ण भारतात लातूरसारखा देखणा शादीखाना शोधूनही सापडणार नाही. जातीय सलोखा राखण्याचे काम महाविकास आघाडीने केला. ही महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची लढाई आहे. ही लढाई महाविकास आघाडी लढतेय आणि या लढाईचे नेतृत्त्व नाना पटोले हे करत आहेत, असेही ते म्हणाले. लक्षवेधक जातीनिहाय जनगणना करणार मराठवाड्यासाठी वॉटर ग्रीड योजना लातूरसाठी सोयाबीन केंद्र सुरु करणार शेतकऱ्यांना १४ तास वीज पुरवठा करणार शिवलिंग शिवाचार्य महाराजांचे स्मारक उभारणार

---

# निवडणूक प्रक्रियेत सहभागी प्रत्येकाने आपली जबाबदारी काळजीपूर्वकपणे पार पाडावी

लातूर :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी काळजीपूर्वकपणे काम करावे, अशा सूचना छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विधानसभा निवडणूक तयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, श्री. टेकाळे, सुरेश बेदमुथा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांच्यासह जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते. मतदानसाठी नियुक्त पथकांनी विशेषतः गृह मतदानासाठी घरोघरी जाणाऱ्या पथकांनी मतदानाच्या गोपनीयतेच्या बाबतीत विशेष खबरदारी घ्यावी. या पथकातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांना याबाबत योग्य प्रशिक्षण दिले जावे. तसेच मतदान केंद्रामध्ये कोणीही मोबाईल घेवून प्रवेश करणार नाही, याची दक्षता घ्यावी. मतदान केंद्रातील मतदान करतानाचे चित्रीकरण केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी दिल्या. निवडणूक प्रचारात, तसेच मतदानाचा जाहीर प्रचार संपल्यानंतर कोणत्याही प्रकारे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मतदान प्रक्रिया भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी, तसेच मद्य, पैसे याचे वाटप होवू नये, यासाठी पोलीस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम हाती घ्यावी. भरारी पथके, स्थिर निगराणी पथकांच्या माध्यमातून मोहीम स्वरुपात तपासणी करून आदर्श आचारसंहितेचे पालन काटेकोरपणे होईल, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही विभागीय आयुक्त यांनी केल्या. मतदार जागृतीसाठी लातूर जिल्हा निवडणूक यंत्रणेकडून राबविण्यात आलेल्या 'कॉफी विथ कलेक्टर' सारख्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ग्रामीण भागात पथके स्थापन करून जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. नवमतदार, महिला यांच्यामध्ये जागृती करून त्यांना मतदानाचे आवाहन करण्यात येत आहे. सर्व शासकीय



अधिकारी, कर्मचारी यांचे शंभर टक्के मतदान होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. लोकसभेतला राज्याच्या सरासरीपेक्षा कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून अशा मतदान केंद्रावर विशेष पथके नेमून मतदार जागृती केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात सहा ठिकाणी आंतरराज्य चेकपोस्ट उभारून वाहनांची तपासणी केली जात आहे. यासोबतच पोलीस दलामार्फत अचानक तपासणी मोहीम राबवून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींची तपासणी केली जात आहे. यासोबतच अवैध मद्यसाठे जप्त करण्यासाठीही शोध मोहीम राबविण्यात आली आहे. पिस्तुलसह विविध शस्त्रे तपासणी मोहिमेमध्ये जप्त करण्यात आली आहेत. यासोबतच मतदान कक्ष, मतदान यंत्र सुरक्षा कक्ष आदी ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना मतदार जागृतीची शपथ देण्यात आली.

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पूर्वपीठिकेचे प्रकाशन**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा निवडणूक यंत्रणा आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पूर्वपीठिका तयार करण्यात आली आहे. या पूर्वपिठिकेचे प्रकाशन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. आतापर्यंत झालेल्या विधानसभा निवडणुकांचे निकाल, सध्याची मतदार संख्या, मतदान केंद्र संख्या, निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क क्रमांकांचा समावेश या पूर्वपीठिकेत करण्यात आलेला आहे.

---

# मुख्यमंत्र्यांकडून सावंत यांच्या चुकीबद्दल लाडक्या बहिणीची जाहीर क्षमा

धाराशिव : प्रतिनिधी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शुक्रवारी (दि.८) धाराशिव जिल्ह्यात महायुतीच्या प्रचारात सभा झाल्या. एकाच दिवशी तीन सभा असल्यामुळे मुख्यमंर्त्यांनी घाई गडबडीत सभा आटोपल्या.

त्यातच परंडा येथील सकाळीची सभा दुपारी दोन वाजता भर उन्हात झाली. यावेळी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तानाजी सावंत यांनी सभेसाठी मंडप न उभारल्यामुळे नाराजी व्यक्त करत भर उन्हात बसलेल्या लाडक्या बहिणीकडे बघत मी आपली माफी मागतो, असे जाहीर केले. केवळ तानाजी सावंत यांनी खर्चाच्या मर्यादा असल्याचे कारण सांगत मंडप टाकता आला नसल्याचे उत्तर दिले.

याउलट मात्र जिल्ह्यात इतर ठिकाणी झालेल्या सभेसाठी आलिशान मंडप उभारण्यात आले होते. मात्र परंडा येथे तानाजी सावंत यांना महिला उन्हात ठेवून खर्च वाचवणे कितीपत योग्य आहे, अशी चर्चा दिवसभर या मतदार संघात सुरु आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा म्हटले की एरवी सर्वत्र तानाजी सावंत यांच्या कार्यक्रमात आलिशान मंडप उभारण्यात येतो. मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येतो. मात्र शुक्रवारी मुख्यमंत्री यांची सभा होणार असल्याचे माहित असताना त्यांनी आलेला नागरिकांना सावलीची सोय केली नाही. विशेष म्हणजे मुख्यमंत्री येण्यापूर्वी बराच वेळ आलेले हे नागरिक व महिला यांना मुख्यमंत्र्यांची वाट पहात उन्हात थांबावे लागले. दुपारी भर उन्हात दोन वाजता मुख्यमंत्री यांच्या सभेला सुरुवात झाली. सध्या कडक ऊन असल्यामुळे महिलांसह नागरिकांची घामाने घालमेल होत होती.

---

# इतर मतदारसंघात निधी येतो मग लातूरला का नाही ? डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचा सवाल

लातूर/प्रतिनिधी: मागील काळात विकासकामांसाठी निधी न आल्यामुळे लातूर शहर भकास झाले आहे.जिल्ह्यातील इतर मतदारसंघात विकास कामांसाठी निधी येतो मग लातूर शहरालाच निधी का मिळत नाही ? असा सवाल भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी उपस्थित केला.

गुरुवारी सायंकाळी पाच नंबर चौक परिसरात झालेल्या सभेत डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर बोलत होत्या.या सभेस शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, माजी अध्यक्ष शैलेश लाहोटी, शैलेश गोजमगुंडे,महिला मोर्चाचा शहराध्यक्ष रागिनीताई यादव,रवी सुडे,दिग्विजय काथवटे, गणेश गोमसाळे,शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सचिन दाने यांच्यासह गणेश गवारे,निखिल गायकवाड, देवाभाऊ साळुंके,राष्ट्रवादीचे प्रशांत पाटील, हवा पाटील,बंटी बोमणे, गणेश बोमणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. चाकूरकर म्हणाल्या की, मागील १५ वर्षात लातूर शहरात विकास कामे झाली नाहीत. शहरातील मूलभूत समस्या सुटल्या नाहीत. नागरिकांचे प्रश्न जसेच्या तसे आहेत.आजही सामान्य नागरिकांना विविध समस्यांना तोड द्यावे लागते.याच काळात जिल्ह्यातील इतर मतदारसंघात मोठ्या प्रमाणात निधी आला, विकासकामे झाली.लातूरमध्ये मात्र विकासनिधी आला नाही. हा निधी का आला नाही ? याचा विचार लातूरकर जनतेने करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

लातूरच्या नेतृत्वाचे शहराच्या विकासाकडे लक्ष नाही.प्रवासी आमदार लातूरकरांना आजवर मिळाला होता.आता मात्र जनतेने महायुतीला साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे लातूरकरांसाठी निवासी आमदार मिळणार असल्याचा विश्वास डॉ. चाकूरकर यांनी व्यक्त केला. मी लातूरकरांची लाडकी बहीण आहे,असेही त्या म्हणाल्या.

शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी सांगितले की,मागे जे झाले ते भविष्यात दिसणार नाही.शहराचा विकास करण्यासाठी भाजपा कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. शैलेश गोजमगुंडे यांनी सांगितले की,स्थानिकांना प्राधान्य द्या असे आमदार सभांमध्ये बोलताना म्हणतात परंतु स्वतःची कामे मात्र स्थानिक युवकांना न देता पुणे-मुंबईच्या कंपन्यांना देतात. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला गेल्याचा आरोप करणारे लातूरचे काम मुंबईला का देतात ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.



यावेळी बोलताना राष्ट्रवादीचे प्रशांत पाटील यांनी स्थानिक आमदारांनी राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे विकास निधीसाठी कधीही मागणी केली नसल्याचे सांगितले. शहरातील कचरा समस्या सोडविण्यात अपयश आल्याबद्दल अजित पाटील कव्हेकर यांनी लातूरच्या आमदारांवर टीकास्त्र सोडले. शहरातून फिरताना नाकाला रुमाल लावावा लागतो,असे ते म्हणाले.

भाजप सरकारने दिलेल्या निधीतून नगरसेवकांनी शहरात विविध विकास कामे केली परंतु विद्यमान आमदार नगरसेवकांच्या कामाचेही श्रेय लाटत असल्याचा आरोप गणेश गोमसाळे यांनी आपल्या मनोगतात केला.

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी शहरातील भ्रष्टाचार संपवण्यासाठी आमदार बदलण्याची गरज असल्याचे सांगितले.

या सभेत बंटी बोमणे,गणेश बोमणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला. त्यांच्या भाजप प्रवेशाने पक्षाला युवाशक्ती मिळाली असल्याचे सांगून या भागातील विकासासाठी त्यांची मदत होणार असल्याचा विश्वास डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केला.

या सभेस शहर मतदारसंघातील नागरिक, भाजपा महायुतीचे पदाधिकारी ,कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# ट्रम्प यांचा उदय आणि जग

रशिया–युक्रेन, इस्त्रायल–हमास, इस्त्रायल–इराण या युद्धांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा आलेला निकाल जगाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानावा लागेल. आपली लष्करी ताकद, जागतिक व्यापारावर असलेली भक्कम पकड आणि जगाच्या विरोधाला न जुमानता आपल्या प्रत्येक महत्त्वाकांक्षेला तडीस नेणार्या या महासत्तेच्या निवडणुकीवर सार्या जगाचं लक्ष केंद्रित होणं अपेक्षितच होतं. जागतिक महासत्ता बनू पाहणारे चीनसारखे राष्ट्र असेल किंवा आपल्या हजारो किलोमीटर मारक क्षमता असलेल्या क्षेपणास्त्रांची अवघ्या जगाला भीती दाखवणारे उत्तर कोरियासारखे राष्ट्र असेल, अमेरिकेचे यांच्यासोबत एकप्रकारे शीतयुद्धच सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेसारखी महासत्ता रिपब्लिकन पक्षाच्या विचारसरणीच्या हाती जाणं जगाच्या दृष्टीनं उत्सुकतेचं आहे.

एका अर्थाने फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन आणि स्वीडनसारख्या पाश्चात्य देशांचे निर्विवाद नेतृत्व करणार्या अमेरिकेवर डोनाल्ड ट्रम्प यांची अध्यक्षपदावर झालेल्या निवडीने पुन्हा एकदा रिपब्लिकन पार्टीचे वर्चस्व प्रस्थापित झाले. डोनाल्ड ट्रम्प हे २०१७ ते २०२१ पर्यंत अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष होते. अध्यक्षीय कारकिर्दीत २०१७ साली झालेले सीरिया विरुद्धचे युद्ध ट्रम्प यांच्या आदेशानुसारच झाले होते.

युक्रेनवरील रशियन आक्रमणाने आंतरराष्ट्रीय जागतिक व्यवस्था हादरली, साहजिकच त्याचे परिणाम अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर झाले. कारण, राष्ट्राध्यक्ष बायडेन यांनी या युद्धात युक्रेनला शस्त्रपुरवठा करण्याचा निर्णय घेतला. म्हणजे अमेरिकेत सत्ता डेमॉक्रॅटिक पक्षाची असो वा रिपब्लिक पक्षाची, कोणत्याही जागतिक युद्धापासून अमेरिकेने स्वतःला अलिप्त ठेवलेले नाही. जगभरातल्या ठराविक देशांच्या समूहाशी असलेले व्यापारिक संबंध असतील किंवा राजनैतिक कूटनीतीचा भाग असेल रशियासारख्या महासत्तेप्रमाणे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अशा युद्धाचे समर्थन हे करावे लागले.

दुसरीकडे इस्त्रायल–हमास युद्धाचं गाझापट्टीपासून सुरू झालेलं स्वरूप दिवसेंदिवस भयाण रूप धारण करत चाललं आहे. एकाचवेळी हमास, लेबनान, सीरिया आणि आता इराण अशी या युद्धाची व्याप्ती वाढतच चालली आहे. गाझापट्टी आणि लेबनानमधील अनुक्रमे हमास आणि हिजबुल्लाह या अतिरेकी संघटनांशी दोन हात करायला अमेरिकेने इस्त्रायलला संपूर्ण पाठिंबा दिला.

बायडेन यांनी गाझामधील युद्धविरामासाठी प्रयत्न करणे कठीण असल्याचे वर्णन केले होते. पण जसे हजारो निष्पाप नागरिकांचे; बालकांचे बळी जाऊ लागले आणि त्याचे पडसाद आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटू लागले, अमेरिकेने इस्त्रायलवर शस्त्रसंधीसाठी दबाव टाकायला सुरुवात केली. पण इस्त्रायलने न जुमानता युद्ध सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. इराणने इस्त्रायलवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर इराणला प्रत्युत्तर देण्याच्या इस्त्रायलच्या निर्णयाला सहमत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले होते. त्यामुळे या युद्धाच्या निमित्ताने इस्त्रायलच्या बाबतीत अमेरिकेचे ‘मी मारल्यासारखे करतो तू रडल्यासारखे कर’ असेच धोरण स्पष्ट दिसते.

२०२४च्या अध्यक्षीय निवडणुकीत रशिया–युक्रेन युद्धात युक्रेनला शस्त्रसामग्री पुरवणे हा सर्वात विभक्त मुद्दा बनला. रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक उमेदवार कमला हॅरिस यांची युद्धात सहभागी होण्याबद्दलची आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी अमेरिकेच्या असलेल्या संबंधांविषयी अतिशय भिन्न मते आहेत. हॅरिस यांनी आपल्या प्रचारात जागतिक युती मजबूत करण्यासाठी बायडेन प्रशासनाच्या प्रयत्नांवर जोर दिला होता तसेच युक्रेनच्या मुद्द्यावर, दोन वर्षांहून अधिक काळ युद्धग्रस्त देशाला अमेरिकेने किती पाठिंबा द्यायचा याचा पुनर्विचार करण्याबाबत मत मांडले होते. रशिया–युक्रेन युद्धात अमेरिकेचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी पाश्चात्य देशांच्या बरोबरीने युक्रेनला अमेरिकेने शस्त्रास्त्रे पुरविली आहेत. म्हणूनच आज रशियासारख्या बलाढ्य देशापुढे युक्रेन टिकून आहे. पण यापुढे ट्रम्प यांची या युद्धाबाबत भूमिका काय राहील हे महत्त्वाचे. भारताच्या अमेरिकेसोबतच्या व्यापाराचा विचार केला, तर अमेरिका अशा मोजक्या देशांपैकी एक आहे ज्यांच्याशी भारताचा व्यापार वाढत आहे. अमेरिका आणि चीनमधील व्यापार कमी होणे यामागे दोन देशांमधील वाढता तणाव हे एक कारण आहे. या संबंधीचा डाटा पाहिल्यास असे लक्षात येते की, २०१३–१४ ते २०१७–१८ आणि २०२०–२१ मध्ये भारताचा सर्वोच्च व्यापार भागीदार चीन होता. पण २०२१ नंतर अमेरिकेचा भारताबरोबरचा व्यापार चीनपेक्षा वाढलेला आहे. २०२१–२२ मध्ये, भारताचा यूएस सोबत ३२.८ अब्ज डॉलरचा व्यापार वाढला होता. बायडेन सरकारप्रमाणेच डोनाल्ड ट्रम्प सरकारबरोबर भारताने अमेरिकेशी असलेले व्यापारी संबंध अधिक दृढ केले तर चीन सोडणार्या कंपन्यांना भारत आमंत्रित करू शकतो. त्यासाठी भारताला अमेरिकन कंपन्यांबरोबर जॉइंट व्हेंचर पद्धतीने दर्जेदार काम करावे लागेल त्यासाठी ट्रम्प सरकारच्या सहयोगाची भारताला अपेक्षा असेल. एकूणच जागतिक महासत्ता या ओळखी बरोबरच शस्त्रास्त्रांची निर्मिती आणि विक्री करणार्या अमेरिकेकडून रशिया–युक्रेन किंवा इस्त्रायल–हमास तसेच इस्त्रायल–इराण या युद्धांबद्दल आणि त्या निमित्ताने जागतिक शांततेसाठी फारशी अपेक्षा करणे वस्तुस्थितीला धरून नसेल. भारताला ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील डेमोक्रॅटिक सरकारकडून व्यापाराच्या आणि राजकीय कूटनीतीच्या माध्यमातून अमेरिकेशी सहयोगाने संबंध प्रस्थापित करण्याची चांगली संधी चालून आली आहे. ट्रम्प सरकार त्यास कसा प्रतिसाद देते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# भोवळ येणार



महाराष्ट्राची यंदाची विधानसभा निवडणूक भोवळ आणणार आहे. मतदानाला जेमतेम १२ दिवस राहिले आहेत, मात्र केवळ मतदारच नाहीत तर निवडणूक लढणारे आणि लढवणारे सगळेच गोंधळात आहेत. पूर्वी मतपत्रिकेवर चार फारतर पाच उमेदवारांची नावे असायची. नंतर ईव्हीएम आले. तेथेही एका मतदारसंघात जास्तीत जास्त ८ ते १० उमेदवार असायचे. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांपाशी मतदार थांबायचे आणि एकाला मत देऊन मोकळे व्हायचे. आता सरासरी १४ उमेदवार प्रत्येक मतदारसंघात असल्याचे सांगितले गेले आहे. त्यात चिन्हांचा गेल्या वर्षभरापासून सुरू झालेला घोळ आहेच, त्यातही एकाच पक्षात आणि एकाच घरात वर्षानुवर्षे एकत्र राहिलेले आता परस्परांच्या विरोधात उभे आहेत. ते जसे परस्परांना परके नाहीत तसेच मतदारांनाही परके नाहीत. मात्र, आपण नेमके कोणाला मत देतो आहोत आणि का देत आहोत किंवा देणार आहोत यामुळे महाराष्ट्रातील मतदार चक्रावला आहे. त्याहीपुढे निवडणुकीनंतर आणखी मोठे बदल घडतील अशीही वाच्यता आहे. म्हणजे नेमके काय होणार आहे? आता एकत्र लढणार्या मित्रांची अदलाबदली घडणार आहे? की सिक्कीमप्रमाणे विरोधी पक्षच राहणार नाही? हा सगळा प्रकारच भोवळ आणणारा आहे. त्यात राज्य कोणत्या दिशेने जाणार याचा अदमास लागेनासा झाला आहे.

महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे हे खरे आहे. उद्योग, शिक्षण, आरोग्य, महसूल, करदाते अशा सगळ्यांच बाबींत वर आहे. केवळ विरोधक ते मानत नाहीत. अर्थात, ते सत्तेवर आल्यावर त्यांचाही हाच दावा आणि आकडेवारी असते जी आताचे सत्ताधारी देत असतात; पण विरोधात असताना या गोष्टी मान्य केल्या तर विरोध कशाचा करणार या न्यायाने ते टीका करत असतात. महाराष्ट्राच्या या विशेष स्थानामुळे दिल्लीचा अथवा त्या त्या वेळेच्या दिल्लीश्वरांचा महाराष्ट्रावर डोळा राहिला आहे. प्रगत राज्य आपल्याकडे असावे असे सगळ्यांना वाटते. तथापि, आताच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील राजकारण खरेच आपल्या प्रगत राज्य या लौकिकाचा वारसा सांगते आहे असे दिसत नाही. पक्षांच्या विचारधारांशी बांधिलकी राखत येथे निवडणुका लढल्या गेल्या आणि मतदारांनीही कौल दिला.

साधारण अर्धे शतक येथे प्रगतीशील आणि सर्वसमावेशक विचारांचे सरकार राहिले आणि त्यामुळेच राज्य पुढे गेले. चालू दशकात किंबहुना गेल्या पाच–सात वर्षांत मती कुंठित करणार्या घटना घडल्या. पुरोगामी विचारधारेचा अभिमान मिळवणारी मंडळी अचानक ज्यांना जातीवादी किंवा प्रतिगामी म्हणून हिणवत होती त्यांच्या मांडवात जाऊन बसली. तद्वतच धर्माच्या नावाने आणाभाका घेणारे आणि आपली कट्टरता अलंकारासारखी सांभाळणारे अचानक सर्वसमावेशकतेची प्रौढी सांगणार्यांच्या गोटात जाऊन बसले. विशेष म्हणजे ही जी अदलाबदली झाली ती दोन्ही बाजूंनी मनापासून स्वीकारली आणि अगदी सहजपणे नवे मित्र एकरूप झाले. मग प्रश्न असा येतो की इतकी वर्षे परस्परांना पुरोगामी आणि प्रतिगामी म्हणून तुटून पडणार्यांत जर एवढेच सख्य होते तर अगोदरच सगळ्यांनी एकत्र यायला हवे होते.

आता जातनिहाय जनगणनेचा मुद्दाही सगळ्यांच्या हाताशी आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर समोर आलेला हा विषय अजूनही थंड झालेला नाही. आता जनगणना केली जाण्याचे सूतोवाच करण्यात आले असले, तरी जातगणना होणार का याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र, महाराष्ट्राच्या निवडणुकीत जात फॅक्टर अचानक स्ट्राँग झाला आहे. त्याअनुरूप उमेदवारांच्या निवडी करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी प्रबळ इच्छुक असूनही केवळ जातीत बसत नसल्यामुळे त्याला डावलून आपल्याकडचा प्रबळ आणि हवा त्या जातीचा उमेदवार मित्रपक्षाला निर्यात करून त्याची उमेदवारी जाहीर केली गेली आहे. प्रत्येक मतदारसंघांमध्ये दोन प्रमुख आघाड्यांचे अधिकृत उमेदवार, त्या आघाड्यांमधील मित्रपक्षांचे असंतुष्ट उमेदवार, ज्यांना लढायचेच आहे असे अपक्ष आणि आपणच निवडून येणार कारण जात हा फॅक्टर आपला मजबूत आहे असे मानणारे अन्य प्रबळ अशी उमेदवारांची भाऊगर्दी झालेली पाहायला मिळते आहे.

उमेदवारीच्या माघारीच्या दिवशी सगळ्या बंडखोरांचे बंड थंड होईल असा आव आणला गेला तरी प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्याचे कारण आमदार होण्याची क्षमता असलेले किंवा पूर्वी आमदारकी भूषवली आहे मात्र नव्या मित्रांमुळे बिचार्यांना आपल्याच मतदारसंघात सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे असे उमेदवार रिंगणात कायम आहेत. सत्ताधारी आघाडीचे १८ तर विरोधी आघाडीतील २२ उमेदवारांना शांत करण्यात अपयश आले आहे. मात्र हे खरेच अपयश आहे की त्यांना लढण्याची मूकसंमती दिली गेली आहे हेही गौडबंगाल आहे. कारण बंडखोरांना उभे राहण्यात दिली गेलेली रसद ही दुसर्या आणि अखेरच्या अंकाची पूर्वतयारी आहे.

निकालाच्या दिवशी कोणत्या एका आघाडीला स्पष्ट जनादेश मिळाला तर आणि त्यांची एकत्र राहण्याची तयारी असेल तर ठीक, अन्यथा आपण बाजू बदलून पलीकडे गेलो आणि त्यांचे गणित जुळत असेल तर तिकडे जाण्याचा पर्यायही खुला ठेवला गेला आहे. त्या दृष्टिकोनातूनही ही प्रबळ बंडखोर मंडळी सत्ता सिंहासनापर्यंत पोहोचवण्यात उपयुक्तच ठरणार आहे. किंबहुना त्यांनी त्याचवेळी पडद्यामागून समोर यावे अशी रचना केली गेली आहे. आज दोन आघाड्या परस्परांशी लढत आहेत आणि त्यातील एका आघाडीचे सरकार येईल असे दिसते तसे नाही.

# समझोता की कूटनीती

लडाखमधील नियंत्रण रेषेवरून भारत आणि चीन या दोन्ही देशांनी सैन्य मागे घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर, आता दिवाळीनिमित्त दोन्ही देश मिठाईची देवाण–घेवाण करीत आहेत. मात्र, चीनकडून हा समझोता आहे की कूटनीती याबाबत प्रश्नचिन्ह आहेच! २१ ऑक्टोबर रोजी झालेल्या करारावर भारत आणि चीन या दोन्ही देशांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. दोन्ही देशांनी आपापल्या लष्करी छावण्या डेपसांग आणि डेमचोक या पठारांवरून हटवल्या आहेत. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी म्हणतात की, भारतीय /चिनी सैन्य विश्वास पुनर्संचयित करण्याचा प्रयत्न करत आहे. रशियामध्ये झालेल्या ब्रिक्स परिषदेच्या पूर्वसंध्येला दोन्ही देशांमध्ये हा करार झाला. पंतप्रधान मोदी आणि जिनपिंग यांच्यामध्ये बैठक पार पडली. याबद्दल बोलताना मोदी म्हणाले, सीमारेषेवर शांतता आणि स्थिरता टिकवून ठेवणे ही दोन्ही देशांची प्राथमिकता आहे. लगेचच दोन्ही देशातील लष्करांनी आपापल्या फौजा मागे घेण्याचा निर्णय घेतला. गलवान खोर्यात २०२० साली झालेल्या चकमकीनंतर ४ वर्षांनी शांतता प्रस्थापित होण्याची चिन्हं आहेत. नियंत्रण रेषेलगतच्या भागात दोन्ही बाजूच्या सैन्याकडून नियमित गस्त घालण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. २०२०च्या जूनमध्ये गलवान खोर्यातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडून भारताच्या हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करणार्या चिनी सैन्याला भारतीय सैन्याने रोखले. हातघाईच्या संघर्षात चीनचे ७० सैनिक मारले गेले. १९६२ नंतर भारत–चीन सीमेवर उडालेला हा सर्वात मोठा हिंसक संघर्ष होता. भारतीय सैन्याने अपूर्व धैर्य आणि शौर्य दाखवून प्रत्यक्ष नियंत्रण रेषा कायम राखण्याचे कार्य केले.



चीनला भारताकडून इतका तीव्र प्रतिकार अपेक्षित नव्हता. त्यामुळे चीनने लडाखमधील संपूर्ण प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर आपले ५० ते ६० हजार सैनिक तैनात केले. भारतानेही या डावपेचाला ‘जशास तसे’ या न्यायाने उत्तर देत आपलेही तितकेच सैनिक प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर उभे केले. भारतानेही आपले रणगाडे, तोफा, चिलखती गाड्या आणि क्षेपणास्त्रे नियंत्रण रेषेवर उभी केली. थोडक्यात, दोन्ही बाजूंचे सैनिक प्रत्यक्ष लढाईच्या पवित्र्यात गेली चार वर्षे उभी आहेत. लवकरच हा तणाव अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, भूतान येथील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपर्यंत पोहोचला. सध्या भारत व चीनचे सुमारे १.२५ लाख सैनिक सीमेवर तैनात आहेत.

कोणत्याही आक्रमणास तयार भारताने संपूर्ण सीमेवर युद्धसज्जता निर्माण केली आणि कोणत्याही आक्रमणाला कडाडून विरोध करण्याची तयारी दर्शविली. भारताचा हा प्रतिसाद अनपेक्षित असला, तरी तो फार काळ टिकणार नाही, अशी चीनची अपेक्षा होती. काही महिन्यांनी भारताची दक्षता ढिली पडेल आणि भारत आपले सैन्य माघारी घेईल, अशी चिनी नेतृत्वाची समजूत होती. पण, महिन्यांमागून महिने गेले, तरी भारतीय लष्कराच्या सज्जतेत काहीच फरक पडला नाही आणि सीमेनजीक भारताकडून पायाभूत सुविधाही भक्कम केल्या जात असल्याचे पाहून चिनी नेतृत्वाचा धीर सुटला. अखेरीस आपल्या डावपेचांना यश येत नसल्याचे पाहून चीनने माघार घेण्याचा निर्णय घेतला. गेली चार वर्षे भारत–चीन सीमेवर केवळ बुक्क्यांची आणि काही वेळेस तीक्ष्ण शस्त्रांच्या प्रहारांची देवाण–घेवाण होत होती. एका हिंसक पर्वानंतर या ४ हजार किमी सीमेवर काही सकारात्मक घडून येत आहे. या वाटाघाटीचे श्रेय सरकारांचे, मुत्सद्देगिरीचे आणि लष्कराचे आहे. पूर्व लडाख सीमेवर उत्तर टोकाकडील देप्सांग आणि दक्षिण टोकाकडील देम्चोक या भागांमध्ये गस्ती सुरू झाली आहे. आता भारतीय सैनिकांना या दोन ठिकाणी २०२० पूर्वस्थितीनुसार निर्धारित बिंदूपर्यंत गस्त घालता येईल. गस्त महिन्यातून किती वेळा असावी आणि गस्तपथकात किती सैनिक असावेत याविषयीच्या अटीशर्ती निश्चित झाल्या आहेत. चिनी लष्कराकडून क्वचितच माघार घेतली जाते, असा जगभरातील देशांचा अनुभव आहे. पण, भारताने चीनला पुन्हा पूर्वीसारखी परिस्थिती निर्माण करण्यास भाग पाडले, हा भारताचा मोठा सामरिक विजय आहे. या निर्णयाद्वारे भारताने आपल्या शेजारी शत्रूराष्ट्रांना सूचक संदेश दिला आहे. चीनसारख्या बलाढ्य देशाला भारत माघार घ्यायला लावू शकतो, तेव्हा इतरांनी आपली कुवत ओळखून मगच भारताशी पंगा घ्यावा.

लष्करी ताकद वापरण्याची धमक केवळ आर्थिकदृष्ट्या किंवा लष्करीदृष्ट्या बलाढ्य असून चालत नाही. ती ताकद वापरण्याची धमक तुमच्या सैन्यामध्ये आणि नेतृत्वाकडे आहे का, यालाच सर्वाधिक महत्त्व असते. डोंगरी युद्धाचा मोठा अनुभव भारतीय लष्कराकडे आहे आणि पूर्वीपेक्षा अधिक अद्ययावत शस्त्रास्त्रे आज भारताकडे आहेत. इतकेच नव्हे, तर ती वापरण्याची इच्छाशक्ती भारताचे नेतृत्व बाळगून आहे, याची जाणीव झाल्यावर चीनला माघार घेण्यावाचून पर्याय राहिला नाही.

चीनवरील अवलंबित्व कमी करणे चीनला धडा शिकवायचा, तर चिनी मालाची भारतात होणारी आयात कमी करणे, चीनवर असलेले अवलंबित्व कमी करणे गरजेचे आहे. करोनामुळे भारताचे आर्थिक नियोजन बिघडले. साथनियंत्रण, अन्नपुरवठा, रोजगारनिर्मिती, आर्थिक मदत अशा महत्त्वाच्या आघाड्यांवर सरकारला लढावे लागले. त्यामुळे चीनकडून भारतात होणारी आयात फुगतच गेली. गेल्या आर्थिक वर्षात चीनकडून भारतात १०१.७४ अब्ज डॉलरची आयात झाली. तुलनेत भारताची निर्यात होती १६.६५ अब्ज डॉलर. आपल्याकडील चिनी आयातीत गेल्या पाच वर्षांमध्ये सुमारे ५५ टक्के वाढ झाली. चीनला आव्हान देता येईल, इतक्या प्रमाणात भारताला आपले उत्पादन क्षेत्रही वाढवता आलेले नाही. आर्थिक आघाडीवर चीनला अमेरिका, युरोपीय समुदाय आणि जपान–कोरिया यांच्याकडून सातत्याने आव्हान मिळते. त्या देशात आर्थिक मंदी येत आहे. त्यामुळे भारताची वाढणारी बाजारपेठ चीनकरता अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळेच भारताचे गस्ती स्वातंत्र्य चीनने मान्य केले आहे. अर्थातच इतर वादग्रस्त भूभागांमध्ये ‘जैसे थे’ परिस्थिती ठेवण्याची चलाखी चीन दाखवत आहे. ती पूर्ववत करण्याविषयी आपण आग्रही असले पाहिजे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले की, लडाखमधील डेपसांग आणि डेमचोक येथील सैन्य मागे घेणे ही पहिली पायरी आहे. भारत आणि चीन यांच्यातील संबंध पूर्वपदावर येतील अशी आशा मी व्यक्त करतो. या पुढे अनेक आव्हांनाना सामोरे जायचे आहे. मोठी आणि विस्तारणारी बाजारपेठ म्हणून आपली दखल जगाला घ्यावी लागते. भारताच्या प्रचंड बाजारपेठेचे आमिष दाखवून, आपण चीनला पुढच्या चार ते पाच वर्षांमध्ये सीमा विवाद पूर्णपणे सोडवण्यात भाग पाडले पाहिजे.

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांची उमंग ऑटिझम सेंटरला भेट.




लातूर :- आज दिनांक ०८/११/२०२४ वार शुक्रवार रोजी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांची उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टीडीसाबिलिटी रिसर्च सेंटर लातूर या ठिकाणी भेट देऊन येथील ऑटिझम (स्वमग्नता), बहुविकलांग, मतिमंद, सेरेब्रल पाल्सी, अस्थिव्यंग,कर्णबधिर - मूकबधिर, ईपलेप्सी, लर्निंग डिसाबिलिटी, मुलांतील अतिचंचलता,हातपाय वाकडे असणे,मूल अभ्यासात हुशार नसणे, मूल उशिरा चालणे, हातपाय कमजोर असणे. इत्यादी दिव्यांग मुलावर येथे देत असलेल्या सेवा सुविधाची माहिती जसे की न्यूरोलॉजिकल ट्रीटमेंट, अर्लीइंटरवेंशन थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, फिजिओथेरपी, सायकॉलॉजिकल थेरपी, रेमेडियल थेरपी, बिहेवियरल थेरपी, स्पीच थेरपी, हायड्रोथेरेपी, सेन्सरी पार्क मधील सेन्सर इंटिग्रेशन थेरपी, इत्यादी दिव्यांगासाठी सुरू असलेल्या थेरेपी व टेस्ट व उमंग सेंटर येथील विविध सोयी सुविधांची माहिती आयुक्त यांनी घेतली विभागीय आयुक्त यांच्या समवेत उपविभागीय आयुक्त डॉ. आनंत गव्हाणे, जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर अनमोल सागर , विभागीय आयुक्त कार्यालयातील .देवीदास टेकाळे, सुरेश बेदमुथा, जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे राजू गायकवाड , शिवराज गायकवाड, तसेच उमंग सेंटरचे सचिव किरण उटगे, व्यवस्थापक ड. श्रीहरी गोरे, डॉ. श्रीशैलम तलारी, गणेश डोंगरे, डॉ वैभव उटगे,डॉ. आचल बंते, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. शिवानी पाटील व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# केज शहरातील एका सराईत गुन्हेगाराला गावठी कट्ट्यासह पोलिसांनी घेतले ताब्यात आर्म क्ट नुसार केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



केज/प्रतिनिधी केज शहरातील एका सराईत गुन्हेगाराला गावठी कट्ट्यासह पोलिसांनी ताब्यात घेतले असून एका आरोपी विरुद्ध आर्म क्ट नुसार केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, दिनांक ७ नोव्हेंबर २०२४ रोजी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना एका गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की,नामे जुबेर मुस्ताक फारोखी याच्या जवळ गावठी कट्टा असून तो त्याचा धाक दाखवून केज शहरातील रोजा मोहल्ला या भागात दहशत माजवत आहे. सदर मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी पोलीस कर्मचाऱ्याला सोबत घेऊन रोजा मोहल्ला या भागात गेले असता पोलिसांना पाहून जुबेर मुस्ताफ फारोखी हा पळू लागला तेव्हा पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्यास बस स्टँडच्या पाठीमागे पकडले असता त्याची अंग झडती घेतली असता त्याच्या कमरेला एक सिल्वर रंगाचा देशी बनावटीचा गावठी कट्टा त्याच्यात मॅक्झीन१ जिवंत काडतुस मिळून आल्याने सदर इसम नामे जुबेर मुस्ताक फारुखी वय २७ वर्षे रा. रोजा मोहल्ला केज ता. केज याच्या विरुद्ध पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आर्म क्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही ही अविनाश बारगळ पोलीस अधिक्षक बीड, चेतना तिडके मॅडम अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोह/ बाळासाहेब अहंकारे, पोअं/ प्रकाश मुंडे यांच्या पथकाने केली आहे सदर आरोपीवर यापूर्वी सुद्धा पोलीस ठाणे येथे बरेच गुन्हे दाखल आहेत सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करीत आहेत.

# एम.एच. २४ साठी (म्हणजे लातूरसाठी) २४०० कोटींची विकासकामे २४ तास फक्त लातूरचा विकास

लातूर :- लातूरची ओळख एम.एच.२४ अशी आहे. या ओळखीला साजेशी ठरावित अशी २४०० कोटींची विकासकामे गेल्या पाच वर्षात माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी केली आहेत. '२४ तास लातूरचा विकास, हाच आमचा ध्यास आणि हाच आमचा श्वास' असे मानत २०१९ ते २०२४ पर्यंत विविध क्षेत्रांचा कायापालट करण्याची प्रचंड ऊर्जा घेऊन त्यांनी काम केले आहे. २४०० कोटींच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांचा २०२४ या वर्षात होणाऱ्या निवडणुकीत एम.एच. २४ ची म्हणजे लातूर शहराची जनता भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या हाताच्या पंजालाच साथ देत विकास करणाऱ्या हाताला मजबूत करणार आहे. विकासदृष्टी असणाऱ्या अमित विलासराव देशमुख यांनी पाण्याच्या नियोजनासाठी २६० कोटींचा निधी खर्च केला. अल्पसंख्यांक व शेतकऱ्यांच्या मुलींच्या वसतिगृहासाठी १२ कोटी, सारथी संस्थेच्या उपविभागीय कार्यालयासाठी १७३ कोटी निधी मंजूर करून आणला. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुसज्ज व्हावे यासाठी ५०० कोटी निधी तर याच महाविद्यालयाच्या स्त्री व बालकांच्या उपचारासाठी ९४ कोटी निधी आणण्यासोबतच वैद्यकीय महाविद्यालयातील मुला मुलींचे नवीन वसतिगृह तयार करण्यासाठी ४ कोटींचा निधी आणण्यात ते यशस्वी झाले. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील २८ गावांच्या विकासासाठी १८६ कोटी तर लातूर शहरातील १८ प्रभागात ३०३ कोटींची विकास कामे केली. विविध प्रकल्पावरील १७६१ कोटी निधी खर्च करत '२४ तास लातूरचा विकास' हे ब्रीद अमित विलासराव देशमुख प्रत्यक्षात जगले. विकासासाठी विकासाची दृष्टी असावी लागते. विकास म्हणजे वरवरची मलमपट्टी नाही तर मूलभूत स्वरूपात आणि शाश्वत गोष्टी करत राहणे, याला विकास म्हणतात. लातूरचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी अमित विलासराव देशमुख यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. विकास एका दिवसात होत नसतो त्यासाठी २४ तास त्याचा विचार करावा लागतो, केलेला विचार कृतीत उतरविण्यासाठी यंत्रणा उभी करावी लागते. पोकळ गप्पा मारत विकास होत नसतो. विकासासाठी अनेक वर्ष खपावे लागते तेव्हा विकासाचा एक पॅटर्न तयार होतो. लातूरचा पॅटर्न हा प्रचंड राजकीय इच्छाशक्तीतून तयार झालेला आहे. म्हणून तो टिकला पाहिजे आणि वाढला पाहिजे.

# आज जनविकास परिवर्तन आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीचे आयोजन

केज/प्रतिनिधी केज विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जनविकास परिवर्तन आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोड कोणाला पाठिंबा देणार याकडे नागरिकांचे लक्ष! याबाबतची सविस्तर माहिती अशी की, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांच्याकडे केज नगरपंचायतची सत्ता आहे व त्यांच्याकडे नगराध्यक्षा सह जवळपास नऊ ते दहा नगरसेवक आहेत. गेल्या २५ वर्षापासून लोकसभेची निवडणूक, असो या विधानसभेचे निवडणूक असो प्रत्येक निवडणुकीमध्ये हारुणभाईइनामदारयांचीनिर्णायकभूमिकाठरलेलीआहे. स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे व स्व. विमलताई मुंदडा यांनी देखील हारुणभाई इनामदार यांना सोबत घेऊन अनेक निवडणुका लढविल्या होत्या व निवडूनही आले होते. केज शहरासह मतदार संघामध्ये हारुणभाई यांना मानणारा मोठा वर्ग आहे व त्यांचा जनसंपर्क चांगल्या प्रकारे आहे सध्या केज नगरपंचायतची सत्ताही त्यांच्याकडेच आहे त्यांच्या जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड आहेत. २०२४ ची केज विधानसभा निवडणूक ही आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडून उमेदवारी नगराध्यक्षा सौ सीताताई बनसोड यांना मिळवून लढवण्याची तयारी हारूणभाई इनामदार यांनी केली होती व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज देखील भरला होता परंतु मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला म्हणून सीताताई बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू आहे परंतु जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी अद्यापही कोणाला पाठिंबा द्यायचा आहे यावर निर्णय घेतलेला नाही. दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ठीक ३-०० वाजता जे.के. फंक्शन हॉल महात्मा फुले नगर केज येथे जनविकास परिवर्तन आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या संवाद बैठकीच्या माध्यमातून हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड काय भूमिका घेणार आहेत हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोड या विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा,माजी आमदार पृथ्वीराज साठे,रमेश तात्या गालफाडे यांच्यासह अन्य कोणाला पाठिंबा देणार आहेत ते संवाद बैठकीनंतरच चित्र स्पष्ट होईल.



# कच्चे व पाश्चराइज्ड यापैकी कोणते दूध पिणे आरोग्यासाठी फायदेशीर? तज्ज्ञांचे मत घ्या जाणून

कच्चे दूध किंवा पाश्चराइज्ड दूध आपल्या दैनंदिन जीवनाचा एक आवश्यक भाग आहे. पण, तुम्ही कधी हा विचार केला आहे का की, दोन्हीपैकी कोणते दूध पिणे आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे? आम्ही याबाबत तज्ज्ञांना प्रश्न विचारला. 'फिसिको डाएट अॅण्ड एस्थेटिक क्लिनिक'च्या संस्थापक व आहारतज्ज्ञ विधी चावला यांनी सांगितले, दूध पिण्यामध्ये कच्चे दूध विरुद्ध पाश्चराइज्ड दूध हा अनेक वर्षांपासून वाद आहे. दुधावर प्रक्रिया करण्याची पद्धत, पौष्टिक सामग्री व सुरक्षितता ही त्यामागील कारणे आहेत. या दोन प्रकारच्या दूधाच्या सेवनाने शरीरात काय काय बदल होतात? कच्चे दूध कच्चे म्हणजे गाई, शेळ्या किंवा मेंढ्यांचे प्रक्रिया न केलेले दूध. त्यामध्ये प्रथिने, चरबी, कॅल्शियम व खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यात फायदेशीर एन्झाइम्स व प्रो-बायोटिक्सदेखील असतात, असे चावला म्हणाल्या. चव आणि सुगंध बऱ्याच लोकांना असे आढळते की, कच्चे दूध पाश्चराइज्ड दुधापेक्षा अधिक समृद्ध, मलईदार चवीचे असते, जे त्याच्या प्रक्रिया न केलेल्या स्वरूपाचा दावा करते. एंझाईम आणि प्रो-बायोटिक्स कच्च्या दुधात लॅक्टोजसारखे एंझाइम्स असतात; जे लॅक्टोज पचविण्यास मदत करतात. त्यात नैसर्गिक प्रो-बायोटिक्सदेखील असतात. सुरक्षितता चावला यांच्या मते, कच्च्या दुधामुळे आरोग्याच्या बाबतीत काही धोके होऊ शकतात. त्यात साल्मोनेला, ई. कोलाय व लिस्टरिया यांसारख्या रोगजनक जीवाणूंचा समावेश होतो. या जीवाणूंमुळे अन्नजन्य आजार होऊ शकतात, जे गंभीर किंवा जीवघेणेदेखील असू शकतात. विशेषत: गर्भवती महिला, लहान मुले, वृद्ध आणि कमकुवत रोगप्रतिकार शक्ती असणाऱ्यांना होणाऱ्या कच्च्या दुधाशी संबंधित आजारांच्या लक्षणांमध्ये मळमळ, उलट्या, जुलाब व पोटदुखी यांचा समावेश असू शकतो, असे चावला म्हणाल्या. पाश्चराइज्ड दूध एंजाइम्स आणि प्रो-बायोटिक्स पाश्चराइज्ड दुधातील जीवाणू नष्ट करण्यासाठी ते गरम केले जाते आणि त्यामध्ये दुधाची मूळ चव आणि पोषक घटक टिकवून ठेवले जातात. पाश्चराइज्ड दुधामुळे हानिकारक जीवाणू नष्ट होतात ते दूध व्हिटॅमिन-बीसारख्या काही उष्मा-संवेदनशील पोषक घटकांची पातळीदेखील कमी करू शकते. पाश्चराइज्ड दूध कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीचा चांगला स्रोत आहे, असे चावला म्हणाल्या.



सुरक्षितता पाश्चराइज्ड दूध वापरण्याचा मुख्य फायदा म्हणजे त्याची सुरक्षितता. त्या अंतर्गत पॅथोजेनिक सूक्ष्म जीव नष्ट केले जातात; ज्यामुळे अन्नजन्य आजाराचा धोका कमी होऊ शकतो, असे चावला म्हणाल्या.

काय निवडणे योग्य? कच्च्या दुधाची चव चांगली असली तरी पाश्चराइज्ड दूध हानिकारक जीवाणूंपासून मुक्त असते. सामान्य लोकांसाठी तापवलेले दूध अधिक सुरक्षित आणि अधिक परवडणारे आहे, असेही चावला यांनी स्पष्ट केले.

# हृदयविकाराचा झटका टाळण्यासाठी विसाव्या वर्षापासून प्रत्येक महिलेने कराव्यात 'या' चार चाचण्या; जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात -

असं म्हणतात की, हृदयविकाराचा धोका हा पुरुषांना जास्त असतो. पण, जागतिक स्तरावर हृदयविकार हे महिलांच्या मृत्यूचे प्रमुख कारण ठरत आहे. हृदयविकाराचा धोका लक्षात घेता, वेळीच लक्षणे ओळखून नियमित तपासणी करणे गरजेचे आहे.

हृदयरोग तज्ज्ञांच्या मते, दीर्घकालीन धोका कमी करण्यासाठी महिलांनी वयाच्या विसाव्या वर्षापासून त्यांच्या हृदयाच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. आज आपण चार प्रमुख चाचण्यांविषयी जाणून घेणार आहोत, ज्या प्रत्येक स्त्रीने केल्या पाहिजेत. याविषयी दी इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने सविस्तर माहिती सांगितली आहे.


रक्तदाब तपासणे उच्च रक्तदाब हा हृदयरोग आणि स्ट्रोकसाठी धोकादायक आहे. उच्च रक्तदाबाची लक्षणे लवकर दिसत नाहीत. नवी दिल्ली येथील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलचे कार्डिओथोरॅसिक, हृदय व फुफ्फुस पुनर्रोपण शस्त्रक्रियेचे वरिष्ठ सल्लागार डॉ. मुकेश गोयल सांगतात, वयाच्या विसाव्या वर्षापासून नियमित रक्तदाब तपासणी सुरू केली पाहिजे. वर्षातून एकदा रक्तदाब तपासणी करणे आवश्यक आहे. उच्च रक्तदाबाची समस्या असलेल्या लोकांनी नियमित तपासणे करणे गरजेचे आहे.

ही चाचणी का महत्त्वाची?

अनियंत्रित उच्च रक्तदाबामुळे हृदयाशी संबंधित समस्या, किडनी खराब होण्याचा धोका आणि स्ट्रोकचा धोका जाणवू शकतो. त्यामुळे निरोगी जीवनशैलीसाठी रक्तदाब (१२०/८० ााक्स पेक्षा कमी) असणे महत्त्वाचे आहे.

कोलेस्ट्रॉल तपासणे शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे हृदयविकाराचा धोका टाळता येतो. कारण- खराब कोलेस्ट्रॉल वाढल्याने रक्तवाहिन्यांमध्ये प्लेक तयार होतात आणि त्यामुळे हृदयविकाराचा झटका व स्ट्रोकचा धोका वाढतो. यथार्थ हॉस्पिटल्स येथील कार्डिओलॉजीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. दीपंकर वत्स सांगतात, ज्या स्त्रियांना लठ्ठपणा आहे किंवा हृदयविकाराशी संबंधित समस्या आहे, त्यांनी धोका लक्षात घेऊन, वयाच्या विसाव्या वर्षांपासून कोलेस्ट्रॉल तपासणी सुरू करणे गरजेचे आहे. जर एखाद्या व्यक्तीला कोणताही धोका नसेल, तर त्यांनी ही चाचणी वयाच्या ४५ व्या वर्षी सुरू करावी आणि दर चार ते सहा वर्षांनी ही चाचणी करीत राहावी.

ही चाचणी का महत्त्वाची? उच्च कोलेस्ट्रॉल हे हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजाराचे प्रमुख कारण आहे. चाचणीनंतर उच्च कोलेस्ट्रॉल निदर्शनास आले, तर जीवनशैलीतील सकारात्मक बदल किंवा उपचाराद्वारे हा धोका टाळता येतो.



रक्तातील ग्लुकोज तसापणी मधुमेह हा हृदयविकारासाठी अत्यंत धोकादायक आहे. रक्तातील साखरेची उच्च पातळी हृदयावर नियंत्रण ठेवणाऱ्या रक्तवाहिन्या आणि पेशींचे नुकसान करते. लठ्ठपणा किंवा मधुमेहाचा कौटुंबिक इतिहास असणाऱ्या लोकांना याचा धोका जास्त असतो. या चाचणीद्वारे मधुमेह किंवा इन्सुलिन रेझिस्टन्सची तपासणी वयाच्या विसाव्या वर्षी सुरू केली पाहिजे. जर तुम्हाला कोणताही धोका नसेल, तर तुम्ही दर तीन वर्षांनी ही तपासणी करणे आवश्यक आहे. खूप जास्त धोका असलेल्या लोकांनी वर्षातून एकदा ही चाचणी करणे आवश्यक आहे. ही चाचणी का महत्त्वाची? रक्तातील साखरेची पातळी वाढल्याने प्री-डायबिटीज, हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे लक्षणे ओळखून लवकर तपासणी करणे, पोषक आहार घेणे आणि नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे.

बॉडी मास इंडेक्स व्यक्ती निरोगी आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी बॉडी मास इंडेक्स म्हणजेच उंची आणि वजनाची एक सोपी गणना केली जाते. डॉ. वत्स यांच्या मते, लठ्ठपणा हा हृदयविकारासाठी धोकादायक घटक आहे; जो उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल, तसेच मधुमेहास कारणीभूत काहे. वयाच्या विसाव्या वर्षापासून बीएमआय च्या नियमित चाचणीमुळे लठ्ठपणासारखा समस्या ओळखता येतात.

ही चाचणी का महत्त्वाची? योग्य वजनामुळे हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. उच्च बीएमआय तपासणी केल्यानंतर नियमित शारीरिक व्यायाम करावा आणि संतुलित आहार घ्यावा, तसेच निरोगी जीवनशैली स्वीकारावी. डॉ. गोयल सांगतात की, काही विशिष्ट प्रकरणांमध्ये हृदयाचे अनियमित ठोके किंवा हृदयाशी संबंधित इतर समस्या तपासण्यासाठी इलेक्ट्रोकार्डिओग्राम चाचणी करू शकता. एखाद्या महिलेला छातीत अस्वस्थता जाणवत असेल किंवा हृदयाचे ठोके अचानक वाढल्यास इलेक्ट्रोकार्डिओग्राम चाचणी करावी.

# मनसेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी प्रचारस जन्मभूमीतून केला शुभारंभ

## विकासाचा डंका वाजवला मग विकास गेला कोठे-रमेश तात्या गालफडे

केज/प्रतिनिधी केज विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांच्या प्रचाराचा शुभारंभ त्यांच्या जन्मभूमी साळेगाव येथून करण्यात आला. साळेगाव येथील हनुमान मंदिर, संत भगवान बाबा मंदिर येथे नारळ फोडून व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, पीर बाबा दर्गा येथे चादर चडवून प्रचाराला सुरुवात केली. २० नोव्हेंबरला रेल्वे इंजिनला मतदान करून रमेश तात्या गालफाडे यांना विधासभेतपाठवून इतिहास रचण्याचे आवाहन केज विधानसभा मतदारसंघातील उपस्थित नागरिकांना केले. पुढे बोलताना रमेश तात्या गालफडे म्हणाले की, केज मतदार संघामध्ये विकासाच्या नावाचा डंका वाजवला जात आहे मग विकास गेला कुठे असा सवाल ही त्यांनी उपस्थित केला आहे. यावेळी उपस्थित मतदारांना संबोधित करताना रमेश तात्या गालफाडे म्हणाले की, मी डंकेकी चोट पे निवडुन येणार आणि केज, अंबाजोगाई,नेकनुर मतदार संघाचा विकास करून दाखवतो गेल्या अनेक वर्षांपासून एक हाती सत्ता असताना मतदार संघाचा काय? विकास झाला मला संधी द्या मी संधीच सोन करून दाखवतो आशी भावनीक साद उपस्थित मतदारांना घातली यावेळी मनसेचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व रमेश तात्या गालफडे यांच्यावर प्रेम करणारे मित्रपरिवार आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# न्याय आणि समतेसाठी लातुरात एकजुटीने परिवर्तनाची पहाट उगवूया

लातूर :– न्याय, समता आणि लातूरकरांच्या सर्वांगिन विकासासाठी वंचित बहुजन आघाडीच्या गॅस सिलिंडर या चिन्हाचे बटन दाबून मला निवडून द्या, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांनी येथे केले. लातूर विधानसभा मतदारसंघातील वंचितचे उमेदवार विनोद खटके यांच्या प्रचारार्थ शहरातील संविधान चौकात महामानवाना वंदन हा गीतांचा प्रबोधणपर कार्यक्रम आणि कॉर्नर सभेचे आयोजन केले होते. त्यावेळी उमेदवार खटके हे बोलत होते या सभेला हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. प्रबोधनाच्या माध्यमातून लोकशाहीचे बळकटीकरणासाठी आणि सर्वसमावेशक विकासाची शपथ घेण्यात आली.समाजातील वंचित आणि शोषित घटकांच्या आवाजाला एकत्रित करणे हा या सभेचा प्रमुख उद्देश होता. सामाजिक न्याय, समानता आणि हक्कांसाठी लढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देणारा हा प्रबोधन सोहळा, नवा उत्साह आणि परिवर्तनाची ज्योत पेटवणारा आहे. असे सांगून उमेदवार खटके म्हणाले, अशा कार्यक्रमातून आपल्या समाजाला प्रगतीची दिशा दाखवण्याचे कार्य यामधून साधले जाणार आहे. एकजुटीने परिवर्तनाची पहाट उगवूया. व्यासपीठावर रिपब्लिकन





सेनेचे महासचिव प्रा.युवराज धसवाडीकर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष सलीमभाई सय्यद महमदभाई शफी, शहराध्यक्ष सचिन गायकवाड, सचिन लामतुरे, नितीन गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## केज मतदारसंघात सौ. नमिता मुंदडा यांनी आणलेल्या रेकॉर्ड ब्रेक विकास निधीमुळे मतदार संघात पडला उजेड



केज / प्रतिनिधी केज मतदारसंघात प्रचाराची सुरुवात झाली आणि मतदार संघात चित्र स्पष्ट झाले निवडणूकीला आता रंगत येणार आहे. कोणी कुठेही जावू द्या कांहीच फरक पडणार नाही मतदार संघात प्रचारादरम्यान एकच मुद्दा महत्त्वाचा होणार आहे, तो म्हणजे मतदार संघात केलेला आणि झालेला विकास भाजपाच्याउमेदवारआ.नमिताताई मुंदडा यांनी मतदार संघात रेकॉर्ड ब्रेक केलेला विकास, आणि मतदार संघात आणलेला निधी याच मुद्दयावर प्रचाराला चांगलीच रंगत येणार आहे. केज मतदारसंघात आ.नमिता मुंदडा यांनी आणलेला विकास निधी जनतेला माहित आहेच, आणि त्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातून सौ. नमिता ताईंना मतदार संघातील जनता मतदानरुपी आशिर्वाद देणार यात शंकाच नाही.यावेळी जनता विकासाला मत देणार हे नक्की!

# लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मतदार जनजागृती रॅली शहरातील सर्व मतदारानी मतदान करावे – आयुक्त बाबासाहेब मनोहरे










लातूर/प्रतिनिधी :– लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आज दिनांक ०८/११/२०२४ रोजी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचे मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती रॅली गांधी चौक ते क्रीडा संकुल पर्यंत आयोजित करण्यात आली . सकाळी ८ वाजता गांधी चौक येथे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचे उपस्थितीमध्ये रॅलीस सुरुवात करण्यात आली. सदर रॅलीमध्ये महिला बचत गटाच्या महिला, पथ विक्रेता समितीचे सदस्य व फेरीवाले, आशा वर्कर, शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी असे एकूण १२०० महिला व पुरुष सहभागी होते.

सदर रॅलीचा समारोप क्रीडा संकुल येथे करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले यावेळी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी मार्गदर्शन केले व शहरातील सर्व मतदारानी येणाऱ्या २० नोव्हेंबर रोजी आपल्या बुथवर जाऊन स्वतः व कुटुंबातील सर्व सदस्यांचे मतदान करून घ्यावे तसेच ज्या मतदारांचे वय ८५ पेक्षा जास्त अशा मतदाराना घरून मतदान करण्याची सोय करण्यात आली असून नवीन मतदार यांनी मिळालेल्या मतदान हक्काचा लाभ घ्यावा व मतदान करावे. गेल्या विधानसभेच्या वेळी झालेल्या मतदान टक्केवारीपेक्षा यावेळी शहरातील मतदारानी मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. यावेळी उपस्थित सर्वांना मतदान करणे बाबत शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास मनपा अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव , उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे , जिल्हाधिकारी कार्यालयाचे जिल्हा सह आयुक्त मंगेश शिंदे, मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, सहायक आयुक्त अजित ढोपे, सहायक आयुक्त निर्मला माने, सहायक आयुक्त खदीर शेख , सहायक आयुक्त विजय राजुरे, सहायक आयुक्त नंदकिशोर तापडे , आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, क्षेत्रीय अधिकारी समाधान सूर्यवंशी , स्वच्छता अधिकारी रमाकांत पिडगे, कलीम शेख, इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर रॅली यशस्वी करण्यासाठी मनपा शिक्षण अधिकारी साहेबराव जाधव, आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, विभागाचे शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव, नितीन सुरवसे , समुदाय संघटक विरेन्द्र सातपुते, उठ्झ, यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपी साठे यांनी केले तर आभार प्रदर्शन बालाजी शिंदे यांनी केले.

## गोरगरीबांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी मला मिळालेल्या आमदारकीचा उपयोग केला

# विकास कामांना गती देण्यासाठी आशीर्वाद द्या- आ. कराड

लातूर : – लातूर ग्रामीण मतदार संघाला मी माझी आई मानतो याच आईचा भ्रष्ट पैशातून काँग्रेसवाल्यांनी केलेला सौदा मान्य झाला नसल्याने मतदारांनी नोटाला विक्रमी मतदान केले त्यामुळेच मला पक्षश्रेष्ठींनी आमदार केले मिळालेल्या आमदारकीचा उपयोग गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी आणि मतदार संघातील गावांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केला असून या विकास कामांना अधिक गती देण्यासाठी मतदारांनी आपल्याला आशीर्वाद द्यावेत असे आव्हान भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आ रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी रेणापूर तालुक्यातील धवेली, आसराचीवाडी, व्हटी नंबर १, सायगाव, गोटाळा, व्हटी नंबर २, खलंग्री, सारोळा, माकेगाव, दिवेगाव, कोष्टगाव, रामवाडी, सुकणी आणि मुसळेवाडी या गावचा प्रचार दौरा केला ठीक ठिकाणी आयोजित प्रचार बैठकीतून आ. कराड यांनी मतदारांशी संवाद साधला. दिवसभराच्या प्रचार दौऱ्यात ठिकठिकाणी मतदारांनी मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषात उमेदवारांचे स्वागत केले. प्रत्येक कार्यक्रमात महिलांची मोठी उपस्थिती होती.

यावेळी त्यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले भाजपाचे सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, भास्कर लहाने, अनंत चव्हाण, ज्ञानोबा भिसे, संजय डोंगरे, सुंदर घुले, माधव घुले, हरिकृष्ण गुरले, सुकेश भंडारे, अमर चव्हाण, गणेश तुरुप, बालाजी केंद्रे, गोपाळ शेंडगे, मारुती गालफाडे, निवृत्ती लहाने, नाथराव गीते, संपत कराड यांच्यासह भाजपा व महायुतीचे प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी होते.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी लातूर ग्रामीणची माझ्यावर ज्या दिवशी जबाबदारी दिली त्या दिवसापासून या भागाची सेवा करण्याचा प्रयत्न करीत आहे गेल्या निवडणुकीत काँग्रेसने केलेल्या सौदेबाजीमुळे मतदारांनी विक्रमी नोटाला मतदान केले या मतदानाची दखल घेऊन पक्षश्रेष्ठीने मला आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली मिळालेल्या संधीच सोन करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मतदार संघातील गावागावात कोट्यावधी रुपयाचा निधी विविध योजनांच्या माध्यमातून मंजूर करून आणला. असे एकही गाव नाही की ज्या गावात कमीत कमी पन्नास लाखाचा निधी मिळाला. निवडून गेलेल्या आमदाराने कुठल्या योजनेला निधी दिला कोणती कामे केली निवडून गेल्यापासून आमदार भेटले तरी का असे प्रश्न उपस्थित करून काँग्रेस आमदारापेक्षा कितीतरी पटीने विकासाची मी कामे केली आपण मला आशीर्वाद द्या निवडून आल्यावर आपल्या गावातील एकही विकासाचे काम शिल्लक ठेवणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.





विधानसभा निवडणुकीत काहीजण काँग्रेसची सुपारी घेऊन निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. हे काँग्रेसचेच पिल्लू आहे त्यांच्या गाडीत काँग्रेसचे डिझेल आहे असे मनसे उमेदवाराचे नाव न घेता टीका करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, ठराविक मते घेण्यासाठीच ते उभे आहेत हे जनतेने तेव्हाच ओळखले असून मतदारांनी आपलं मत वाया घालू नये आपल्या गावात आणि परिसरात केलेल्या विकास कामाच्या पाठीशी खंबीरपणे राहुन महायुतीला मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले.

निष्क्रिय काँग्रेसच्या आमदाराविरुद्ध मतदारातून प्रचंड असंतोष असल्याने संपूर्ण मतदारसंघात परिवर्तनाचे वातावरण निर्माण झाले आहे या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत देशमुखचा पराभव होऊन मतदारसंघात नवे परिवर्तन घडवून येणार आहे तेव्हा आपणही मागे राहू नये असे सांगून महायुती शासन सुरू केलेल्या शेतकरी, शेतमजूर, महिला, उद्योजक, युवकासह गोरगरीब सर्वसामान्याच्या कल्याणाच्या योजना राबवित आहे. विविध योजना या पुढील काळातही कायमपणे सुरू ठेवण्यासाठी राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर येणे ही काळाची गरज असेही आ कराड यांनी ठिकठिकाणी बोलून दाखविले.

## उमेदवार अमित देशमुख यांनी लातूर शहरातील ख्रिश्चन एकता मंचच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला दिली भेट

ख्रिश्चन समाज बांधवांनी महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार अमित विलासराव देशमुख यांना लातूर जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना या विधानसभा निवडणुकीत ख्रिश्चन समाजातर्फे पाठिंबा दिल्याचे पत्र दिले.




लातूर / प्रतिनीधी :– लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील एसओएस परिसरातील ख्रिश्चन एकता मंच लातूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला भेट देऊन कार्यक्रमाचा आनंद घेतला . यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी खासदार सुधाकर श्रंगारे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, सुप्रसिद्ध गायक इमॅन्युअल गोलार, प्रभुदास दुप्ते, बेंजामिन दुप्ते, संभाजी सूळ, सचिन बंडापल्ले, भाऊसाहेब भडीकर, राज क्षिरसागर, संभाजी सुळ, अशोक भोसले, राम स्वामी, व्यंकटेश पुरी, निजाम शेख, विवेक दुप्ते, शमवेन दुप्ते आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी ख्रिश्चन समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किनवट तालुक्यात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद; नागरिक हैराण ! पिसाळलेल्या कुत्र्या पासून लहान मुलांना धोका

किनवट/शेख शौकत :–मागील काही दिवसांपासून किनवट तालुक्यात शहरी व ग्रामीण मोकाट श्वानांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे निदर्शनास येत आहे. अशा श्वानांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी प्रशासनाची असून सदर विभागाकडून होणारा कानाडोळा नागरिकाच्या जिवावर उठल्याचे दिसून येत आहे. घरासमोर अंगणात खेळणारी लहान मुले विद्यार्थी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या अंगावर धावून जाण्यापर्यंत या भटक्या कुत्र्यांची मजल गेली आहे. त्यामुळे शहरातील नागरिक हैराण झाले आहेत. काही दिवसांपूर्वीच गोकुंदा येथील चिमुकलीला श्वानाने गंभीर जखमी केल्याची उदाहरण ताजे असून प्रशासन मात्र याकडे साफ दुर्लक्ष करत आहे. पहाटे मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर निघणाऱ्या महिला, पुरुषांसाठी व रात्री घरी परतणाऱ्या दुचाकीस्वारांसाठी भटके श्वान डोकेदुखी ठरू लागली आहेत. हीच परिस्थिती संपूर्ण तालुक्यात असून, मोकाट श्वानांमुळे



नागरिकांचा जीव धोक्यात सापडल्याचे चित्र दिसून येते. मागील कालावधीत शहरासह ग्रामीण भागात श्वान दंश झालेल्या अनेक जणांवर उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे उपचार करण्यात आले. उघड्यावर मांस विक्री केल्या जाणाऱ्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांच्या झुंडी रस्त्याच्या मधोमध ठिय्या मांडून बसतात. यामध्ये शहरातील मटन मार्केट, उपजिल्हा रुग्णालय राष्ट्रीय महामार्ग व गल्लीबोळातील रस्ते आदी ठिकाणी भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी प्रशासनाने पावले उचलावीत अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE